**महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)**

(महाराष्ट्र शासन स्वायत्त संस्था)

औंध रोड, स्पायसर कॉलेज समोर, पशुसंवर्धन आयुक्तालया शेजारी औंध, पुणे-४११ ००७.

**दूरध्वनी क्र.** ०२०-२५६९०६२३ **ई-मेल**-meda@mahaurja.com **संकेतस्थळ** www.mahaurja.maharashtra.gov.in

---

## सरळसेवा जाहिरात क्रमांक ०१/२०२५

महाराष्ट्र राज्यातील अपारंपरिक व ऊर्जा स्त्रोतांचा विकास करणेकरीता महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) या संस्थेची महाराष्ट्र शासनाकडून शासकीय संस्था म्हणून स्थापना झालेली आहे.

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) या संस्थेच्या आस्थापनेवरील गट-'ब' मधील **प्रकल्प कार्यकारी अधिकारी** व गट-'क' मधील **प्रकल्प अधिकारी व लेखापाल** ही पदे सरळसेवेने भरणेकरीता पात्र उमेदवारांकडून महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) संस्थेच्या https://www.mahaurja.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या https://ibpsreg.ibps.in/medasep25/ या वेबलिंक वरून फक्त ऑनलाईन (Online) पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**१. रिक्त पदांचा व अनुशेष तपशिल खालीलप्रमाणे आहे.**

**पदनाम- प्रकल्प कार्यकारी अधिकारी (Project Executive Officer) (गट-'ब')**

**भरावयाची पदे-१८**

| एकुण मंजूर पदे | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | सा.शै.मा.प्र. (एसईबीसी) | आ.दु.घ. (ईडब्ल्यूएस) | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **भरावयाची पदे** | **०२** | **०१** | **०१** | **०१** | **०१** | **००** | **००** | **०३** | **०२** | **०२** | **०५** | **१८** |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण (समांतर आरक्षण व्यतिरिक्त) | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०२ | ०१ | ०१ | ०३ | **१२** |
| महिला आरक्षण (३०%) | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०२ | **०६** |
| खेळाडू (५%) | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | **००** |
| दिव्यांग(४%) | **०१** | | | | | | | | | | | |
| अनाथ (१%) | **००** | | | | | | | | | | | |

**दिव्यांग प्रवर्ग:** **a)** D, HH, **b)** OL, CP, LC, Dw, AAV, **c)** ASD (M), SLD, MI, **d)** MD involving (a) to (c)

Abbrivation : D= Deaf, HH= Hard of Hearing, OL= One Leg, CP= Cerebral Palsy, LC= Leprosy Cured, Dw= Dwarfism, AAV= Acid Attac Victims, ASD(M)=Austim Spectrum Disorder (Mild), SLD= Specific Learning Disability, MI= Mental Illness, MD= Multiple Disability.

Mahabharti.in

**पदनाम- प्रकल्प अधिकारी (Project Officer) (गट-‘क’)**

**भरावयाची पदे-२२**

| एकुण मंजूर पदे | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | सा.शै.मा.प्र. (एसईबीसी) | आ.दु.घ. (ईडब्ल्यूएस) | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **भरावयाची पदे** | **०२** | **०२** | **०१** | **००** | **०१** | **०१** | **००** | **०४** | **०२** | **०२** | **०७** | **२२** |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण (समांतर आरक्षण व्यतिरिक्त) | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०२ | ०१ | ०१ | ०३ | **१२** |
| महिला आरक्षण (३०%) | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०२ | **०७** |
| माजी सैनिक (१५%) | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०१ | **०२** |
| खेळाडू (५%) | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | **००** |
| प्रकल्पग्रस्त (५%) | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | **००** |
| भूकंपग्रस्त (२%) | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | **००** |
| अंशकालीन (१०%) | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | **०१** |
| दिव्यांग(४%) | **०१** | | | | | | | | | | | |
| अनाथ (१%) | **००** | | | | | | | | | | | |

**दिव्यांग प्रवर्ग: a)** D, HH, **b)** OL, CP, LC, Dw, AAV, **c)** ASD (M), SLD, MI, **d)** MD involving (a) to (c)

Abbrivation: D= Deaf, HH= Hard of Hearing, OL= One Leg, CP= Cerebral Palsy, LC= Leprosy Cured, Dw= Dwarfism, AAV= Acid Attac Victims, ASD(M)=Austim Spectrum Disorder (Mild), SLD= Specific Learning Disability, MI= Mental Illness, MD= Multiple Disability.

**पदनाम- लेखापाल (Accountant) (गट-‘क’)**

**भरावयाची पदे-०२**

| एकुण मंजूर पदे | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | सा.शै.मा.प्र. (एसईबीसी) | आ.दु.घ. (ईडब्ल्यूएस) | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **भरावयाची पदे** | **०१** | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **०१** | **०२** |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण (समांतर आरक्षण व्यतिरिक्त) | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ |
| महिला आरक्षण (३०%) | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| माजी सैनिक (१५%) | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| खेळाडू (५%) | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| प्रकल्पग्रस्त (५%) | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| भूकंपग्रस्त (२%) | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| अंशकालीन (१०%) | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| दिव्यांग(४%) | **००** | | | | | | | | | | | |
| अनाथ (१%) | **००** | | | | | | | | | | | |

Mahabharti.in

## २. शैक्षणिक अर्हता, अनुभव व वेतनश्रेणी.

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता व अनुभव | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १. | **प्रकल्प कार्यकारी अधिकारी** | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची प्रथम श्रेणी अभियांत्रिकी पदवी **आणि** नविन व नविकरणीय ऊर्जा क्षेत्रातील ५ वर्षांचा अनुभव.<br>**किंवा**<br>२) मान्यता प्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी पदवी **आणि** नविन व नविकरणीय ऊर्जा क्षेत्रातील ७ वर्षांचा अनुभव. | पीबी-३, एस-२०<br>रू.५६,१००- रू.१,७७,५०० |
| २. | **प्रकल्प अधिकारी** | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची प्रथम श्रेणी अभियांत्रिकी पदवी.<br>**किंवा**<br>२) मान्यता प्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी पदवी **आणि** नविन व नविकरणीय ऊर्जा क्षेत्रातील ३ वर्षांचा अनुभव.<br>**किंवा**<br>३) मान्यता प्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी पदविका **आणि** नविन व नविकरणीय ऊर्जा क्षेत्रातील ७ वर्षांचा अनुभव.<br>(पदवीधर उमेदवारास प्राधान्य दिले जाईल). | पीबी-२, एस-१५,<br>रू.४१,८००- रू.१,३२,३०० |
| ३. | **लेखापाल** | अकाउंटन्सी आणि ऑडिटिंग विषयासह वाणिज्य शाखेची मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी **आणि** खाजगी / शासकीय क्षेत्रातील लेखा सहाय्यक म्हणून काम करण्याचा ५ वर्षांचा अनुभव. | पीबी-२, एस-१५,<br>रू.४१,८००- रू.१,३२,३०० |

## ३. वयोमर्यादा :

| **वयोमर्यादा गणण्याचा दिनांक** | **किमान वय (वर्ष) सर्व प्रवर्गासाठी** | **कमाल वयोमर्यादा (वर्षे)** | | | | | | **पदवीधर / अंशकालीन उमेदवार** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **अराखीव / खुला प्रवर्ग** | **मागासवर्गीय, खेळाडू / अनाथ / आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक** | **प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / दिव्यांग / स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य** | **माजी सैनिक** | | | |
| | | | | | **अराखीव प्रवर्ग** | **मागासवर्गीय प्रवर्ग** | **दिव्यांग** | |
| अर्ज स्विकृतीचा अंतिम दिनांक | १८ | ३८ | ४३ | ४५ | ३८ + सेवेचा कालावधी अधिक ३ वर्ष | ४३ + सेवेचा कालावधी अधिक ३ वर्ष | ४५ | ५५ |

१. दिनांक १८/११/२०२५ रोजी वरील सर्व पदांकरीता उमेदवाराचे किमान व कमाल वय वरील तक्त्यामध्ये नमुद केलेप्रमाणे असेल. (महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक, एसआरव्ही-

Mahabharti.in

२०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२, दिनांक २५.०४.२०१६) मधील तरतुदीनुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी वयोमर्यादा किमान १८ वर्ष असावे व कमाल वय ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१० अन्वये स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचाऱ्यांसाठी गट 'क' मधील नियुक्तीसाठी वय ४५ वर्षे इतके अनुज्ञेय राहिल.

३. वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, माध्यमिक (एस.एस.सी.) शालांत परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल. उपरोक्त वयोमर्यादा ही अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास विचारात घेण्यात येईल.

४. खेळाडूंकरीता कमाल वयोमर्यादा ०५ वर्षे शिथिलक्षम राहिल. तथापि, कोणत्याही प्रवर्गातील उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहिल. (महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दिनांक ०१.०७.२०१६)

५. माजी सैनिकांकरीता वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहिल. तसेच अपंग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहिल. (सामान्य प्रशासन विभाग शुद्धीपत्रक क्रमांक, मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दिनांक २०.०८.२०१०)

६. प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहिल. (सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक विकाक २२१५/प्र.क्र.३३७/१६-अ, दिनांक ०४.११.२०१६)

७. अनाथ आरक्षणाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांना ४३ वर्षे इतकी कमाल वयोमर्यादा लागू राहिल. (महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दिनांक २३.०८.२०२१)

८. शासकीय कार्यालयात तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर पदवीकाधारक अंशकालीन उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादा ५५ वर्षे राहिल. (महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक अशंका १९१८/प्र.क्र.५०७/१६-अ, दिनांक ०२.०१.२०१९)

९. स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्यांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहिल. (महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ, दिनांक ०६.१०.२०१०)

Mahabharti.in

१०. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवारांसाठी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२.०२.२०१९ नुसार कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे इतकी राहिल.

**४. समांतर आरक्षण नियम व अटी :**

**१) खेळाडू आरक्षण :**

१. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक ०१.०७.२०१६, तसेच शासन शुद्धीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक १८.०८.२०१६, शासन शुद्धीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक १०.१०.२०१७, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण १७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२ दिनांक ३०.०६.२०२२ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

२. प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

३. खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, या विषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उप संचालक कार्यालयाकडे पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडूसाठी आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

४. एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणाऱ्या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडे सादर करणे बंधनकारक आहे.

**२)** परीक्षेकरीता अर्ज सादर करताना खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीचा सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारस / नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल.

Mahabharti.in

**३) दिव्यांग आरक्षण :**

१. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६-अ दिनांक २९.०५.२०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

२. दिव्यांग उमेदवाराने किमान ४० टक्के दिव्यांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेल्या व निवड झालेल्या दिव्यांग उमेदवारांना वैद्यकिय मंडळाने शारीरिकदृष्ट्या पात्र ठरविल्यानंतरच त्यास प्रत्यक्ष नेमणूक देण्यात येईल.

३. दिव्यांग व्यक्तींकरीताचे आरक्षण एकुण समांतर आरक्षण आहे. दिव्यांगासाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश, उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे त्या सामाजिक प्रवर्गातून करण्यात येईल.

४. सर्वसाधारण उमेदवारांप्रमाणे तसेच प्रचलित नियमाप्रमाणे दिव्यांग उमेदवारांना देण्यात आलेल्या सवलतींचा लाभ न घेता एखाद्या पदावर निवड झाली असेल अशा दिव्यांग उमेदवारांची गणना दिव्यांगासाठी आरक्षित पदावर करण्यात येत नाही व दिव्यांगासाठी आरक्षित पदे / पद हे दिव्यांग उमेदवारांमधून भरण्यात येईल.

५. दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकुण पदसंख्येपैकी असतील.

६. दिव्यांग व्यक्तींची संबंधित संवर्ग / पदाकरीता पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहिल.

७. दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक अप्रकी-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६ दिनांक १४.०९.२०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आलेले नविन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. सदर प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याकरीता विहित केलेल्या अंतिम दिनांकास वैध असलेले आवश्यक राहिल.

८. लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार / व्यक्ती खालील सवलतींच्या दाव्यास पात्र असतील.

अ) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४० % अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद लक्षणीय दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोयी सवलती.

आ) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४० % अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद संबंधित दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केलेले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय सोयी-सवलती.

Mahabharti.in

**४) अनाथ आरक्षण :**

१. अनाथ व्यक्तीचे आरक्षण हे शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३/ दिनांक ०६.०४.२०२३ व समक्रमांकाचे शासन पुरकपत्र दि. १०.०५.२०२३ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहिल.

२. अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश सदर उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

३. महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभागाकडील, शासन निर्णय क्रमांक अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३ दिनांक ०६.०९.२०२२ तसेच दिनांक ०६.०४.२०२३ अन्वये अनाथ प्रवर्गासाठी दावा दाखल करणाऱ्या उमेदवाराने अर्ज सादर करतेवेळी महिला व बाल विकास विभागाकडील सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल. अन्य यंत्रणांमार्फत वितरीत करण्यात आलेली प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

४. अनाथ आरक्षणाचा लाभ घेऊन शासन सेवेत रूजू होणाऱ्या उमेदवारांना अनाथ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यात येईल. अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे मूळ अधिवास प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीचेवेळी सादर करणे आवश्यक राहिल. नियुक्ती पश्चात ६ महिन्यांच्या कालावधीत आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांचेकडून अनाथ प्रमाणपत्राची पडताळणी करून घेण्यात येईल.

५. अनाथांसाठी ''संस्थात्मक'' व ''संस्थाबाह्य'' अशा दोन प्रकारामध्ये आरक्षण देय राहिल.

**अ) संस्थात्मक आरक्षण:** संस्थात्मक आरक्षणामधून लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांमध्ये ज्यांच्या वयाची १८ वर्षे पुर्ण होण्यापुर्वी त्यांच्या आई वडीलांचे निधन झाले आहे व ज्यांचे शासन मान्यताप्राप्त संस्थांमध्ये पालन पोषण झाले आहे अशा उमेदवारांचा समावेश असेल. (महिला व बाल विकास विभागांतर्गत बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ अन्वये कार्यरत बालकांच्या काळजी व संरक्षणाशी संबंधित संस्थांमध्ये तसेच महिला व बाल विकास विभागाव्यतिरिक्त अन्य विभागांकडून मान्यता प्रदान करणेत आलेल्या अनाथालये अथवा तत्सदृश संस्थांमध्ये पालन झालेल्या अनाथांचा यामध्ये समावेश असेल.)

Mahabharti.in

**आ) संस्थाबाह्य आरक्षण:** संस्थाबाह्य आरक्षणामधून लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांमध्ये ज्यांच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यापुर्वी त्यांच्या आई वडीलांचे निधन झाले आहे आणि ज्यांचे शासन मान्यताप्राप्त संस्थेबाहेर / नातेवाईकांकडे संगोपन झालेले आहे अशा उमेदवारांचा समावेश असेल.

६. महिला व बाल विकास विभाग, शासन पुरकपत्र क्रमांक अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दिनांक १०.०५.२०२३ अन्वये अनाथांच्या एका प्रवर्गासाठी उपलब्ध जागांवर गुणवत्तेनुसार त्या प्रवर्गातील अनाथ उमेदवार पर्याप्त प्रमाणपत्र उपलब्ध होऊ शकले नाहीत तर ती पदे अनाथांच्या दुसऱ्या प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील. सबब, सदर जाहिरातीमध्ये अनाथांच्या एका प्रवर्गासाठी पद राखीव असले तरी, दोन्ही प्रवर्गातील (संस्थात्मक / संस्थाबाह्य) उमेदवारांनी अर्ज सादर करणे आवश्यक राहिल.

**५) माजी सैनिकांकरीता आरक्षण :**

१. महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक क्रमांक आरटीए-१०७९/४८२/१६-अ दिनांक १६.०४.१९८१ नुसार, माजी सैनिकांसाठी १५ टक्के समांतर आरक्षण राहिल.

२. उमेदवार स्वत: माजी सैनिक असल्यास त्याने त्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे, अन्यथा त्यास माजी सैनिकांना अनुज्ञेय असलेले लाभ मिळणार नाहीत.

३. माजी सैनिकांकरीता आरक्षणा संदर्भातील तरतुदी शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार असतील.

४. गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केली असल्यास मूळ प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिकाऱ्याकडून पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती आदेश देण्यात येणार नाही.

५. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. आरटीए-१०८२/३५०२/सीआर-१००/१६-अ दिनांक ०२.०९.१९८३ नुसार,

**अ)** माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदांवर भरती करताना युद्ध काळात आणि युद्ध नसताना सैन्यातील सेवेमुळे दिव्यांगत्व आले असल्यास, असा माजी सैनिक १५ टक्के राखीव पदांपैकी उपलब्ध पदांवर प्राधान्य क्रमाने नियुक्ती देण्यास पात्र राहिल.

**आ)** युद्ध काळात किंवा युद्ध नसताना सैनिक सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटूंबातील फक्त एका व्यक्तीला त्या नंतरच्या पसंतीक्रमाने १५ टक्के

आरक्षित पदांपैकी उपलब्ध पदावर नियुक्तीस पात्र राहिल. तथापि, उमेदवाराने महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) संस्थेच्या सेवा प्रवेश नियमानुसार पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

६. आवश्यक प्रमाणपत्र :

**अ)** सैनिकी सेवेतून मुक्त केल्याबाबतचे प्रमाणपत्र :

माजी सैनिकांसाठी असलेल्या वयोमर्यादा व आरक्षणाचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी विहित नमुन्यात सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**आ)** जात प्रमाणपत्र व नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र :

उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गामध्ये समाविष्ट होत असेल, त्या प्रवर्गासंबंधीचे जात प्रमाणपत्र तसेच वैध नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (लागू असल्यास) सादर करणे आवश्यक आहे.

७. जाहिरातीमध्ये नमुद पदांकरीता नमुद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणे अनिवार्य राहिल.

**६) प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण :**

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एईएम-१०८०/३५/१६-अ दिनांक २०.०१.१९८० तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमुद करण्यात येणाऱ्या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण राहिल.

२. गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांचेकडील प्रकल्पग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहिल. निवड झालेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवाराचे मूळ प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या अधिकारी यांचे कार्यालयाकडून पडताळणी करून घेतले जाईल.

३. सदर पडताळणीअंती प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

**७) भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण :**

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक भूकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ दिनांक २७.०८.२००९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण राहिल.

२. गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या भूकंपग्रस्त उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांचेकडील भूकंपग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे

Mahabharti.in

बंधनकारक राहिल. निवड झालेल्या भूकंपग्रस्त उमेदवाराचे मूळ प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या अधिकारी यांचे कार्यालयाकडून पडताळणी करून घेतले जाईल.

३. सदर पडताळणीअंती प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

**८) पदवीधर अंशकालीन कर्मचारी आरक्षण :**

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ दिनांक २७.१०.२००९ व शासन निर्णय क्र.पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ दिनांक १९.०९.२०१३ नुसार शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या उमेदवाराने सदरच्या अनुभवाची रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये नोंद केलेली असणे आवश्यक राहिल.

२. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांची त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील मुळ प्रमाणपत्र व तहसिलदार यांचेकडील प्रमाणपत्र कागदपत्रांच्या पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहिल.

३. सदर पडताळणी अंती प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

४. उपरोक्त दिनांक १९.०९.२०१३ शासन निर्णयानुसार अंशकालीन उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पद गुणवत्तेनुसार उपलब्ध पात्र उमेदवारांमधून दिनांक १६.०३.१९९९ च्या शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार भरण्यात येईल.

**९) महिला आरक्षण :**

१. महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास, शासन निर्णय क्र. ८२/२००१/मसंआ-२०००/प्र.क्र.४१५/कार्या-२, दिनांक २५.०५.२००१ नुसार महिलांसाठी ३०% आरक्षण राहिल.

२. महिलांकरीता आरक्षित पदावर पात्र महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या त्या प्रवर्गातील पात्र पुरूष उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

३. महिलांसाठी आरक्षित पदांकरीता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domicile) असल्याबाबतचे प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणी करावयाच्या वेळेस सादर करावे.

४. महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास, शासन निर्णय क्र. महिआ-२०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ०४.०५.२०२३ अन्वये खुल्या गटातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आलेली आहे.

Mahabharti.in

५. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणाऱ्या महिलांना त्या-त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणी करावयाच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे.

**१०) खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आरक्षण (EWS) :**

१. सदरचे आरक्षण हे खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १० टक्के आरक्षण लागू करण्यात आलेले आहे.

२. खुल्या प्रवर्गाव्यतिरिक्त इतर प्रवर्गातील उमेदवारांना सदर आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय नाही.

३. या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराच्या / उमेदवाराच्या कुटूंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रू. ८.०० लाखाच्या आत असले पाहिजे व ती व्यक्ती किंवा तिचे कुटूंबीय महाराष्ट्र राज्यात दि. १३ ऑक्टोबर, १९६७ रोजी किंवा त्यापुर्वीचे रहिवासी असणे आवश्यक आहे.

४. उमेदवाराकडे सक्षम प्राधिकारी यांनी विहित नमुन्यातील निर्गमित केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

५. ‘‘आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक’’ (ईडब्ल्यूएस) या संवर्गातील उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दिनांक १२.०२.२०१९ व दिनांक ३१.०५.२०२१ अन्वये विहित करण्यात आलेले मूळ प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याकरीता विहित केलेल्या अंतिम दिनांकास वैध असलेले आवश्यक राहिल.

६. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील उमेदवारांच्या प्रमाणपत्रांचा ग्राह्यता कालावधी शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. राआधो २०२३/प्र.क्र.४०/१६-अ दिनांक २३.०३.२०२३ नुसार समजण्यात येईल.

७. ‘‘आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक’’ (ईडब्ल्यूएस) या प्रवर्गाच्या आरक्षणांसदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**११) सर्वसाधारण अटी :**

१. उमेदवार हा भारतीय नागरीक व त्याच्याकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे.

२. जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेली प्रवर्गनिहाय पदसंख्या कमी, जास्त अथवा रद्द होण्याची शक्यता आहे, त्यानुसार आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे. पदसंख्येत / आरक्षणात बदल झाल्यास त्याबाबतचा वेगळा खुलासा जाहिरातीद्वारे वा अन्य मार्गाने करण्यात येणार नाही.

Mahabharti.in

३. जाहिरातीतील नमुद केलेल्या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांनीच अर्ज करावा. संबंधित पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा, ही उमेदवारांची कोणतीही कागदपत्रे व शैक्षणिक अर्हता यांची पूर्व तपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला नियुक्तीबाबतचे कोणताही हक्क राहणार नाही. उमेदवारांनी ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना, अर्जात भरलेल्या माहितीच्या अनुषंगाने, कागदपत्रांच्या पूर्ण पडताळणीनंतर तसेच शैक्षणिक पात्रता, अनुभव, इत्यादी पुर्ततेच्या अधीन राहून उमेदवारास गुणवत्तेच्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षण निहाय नियुक्ती केली जाईल.

४. परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकुण व प्रवर्गनिहाय पद संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार मा. महासंचालक महाऊर्जा यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

५. विविध मागास प्रवर्ग, महिला, प्राविण्य प्राप्त खेळाडू, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, अंशकालीन, दिव्यांग, अनाथ, इत्यादींसाठी सामाजिक व समांतर आरक्षण शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहिल.

६. एखादी जात / जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यासच तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले जात प्रमाणपत्र उमेदवाराकडे अर्ज सादर करतानाच उपलब्ध असेल तर संबंधित जात / जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

७. समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र. १६/१२/१६-अ दिनांक १३.०८.२०१४ तसेच शासन शुद्धीपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकिर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ दिनांक १९.१२.२०१८ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

८. शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सीबीसी-२०१२/प्र.क्र.१८२/विजाभज-१, दिनांक २५.०३.२०१३ अन्वये विहित कार्यपद्धतीनुसार तसेच शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या आदेश, शुद्धीपत्रकानुसार जाहिरातीमध्ये नमुद अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक, संबंधित उमेदवार उन्नत व प्रगत व्यक्ती / गटामध्ये मोडत नसल्याबाबतची पडताळणी करणेसाठी गृहीत धरण्यात येईल.

९. शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सीबीसी-२०१३/ प्र.क्र.१८२/विजाभज-१, दिनांक १७.०८.२०१३ अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गट मोडत नसल्याचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राच्या वैधतेचा कालावधी विचारात घेण्यात येईल.

१०. सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी सामाजिक आरक्षणांतर्गत अर्ज सादर केलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदांवरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

११. अराखीव (खुला) प्रवर्गातील उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषांसंदर्भातील अटी व शर्तींची पुर्तता करणाऱ्या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारासह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदांवरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित / उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गा संदर्भातील माहिती अचूकपणे नमुद करणे बंधनकारक आहे.

१२. कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

१३. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक कमसी-१००७/प्र.क्र.३६/का३६ दिनांक १०.०७.२००८ नुसार महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांतील मराठी भाषिक उमेदवार संबंधित पदांच्या सेवा प्रवेश नियमातील सर्व अटी व शर्तींची पूर्तता करीत असल्यास ते उमेदवार त्या संबंधित पदांसाठी अर्ज करू शकतील. त्यासाठी संबंधित मराठी भाषिक उमेदवारांनी ते महाराष्ट्र शासनाने दावा केलेल्या ८६५ गावातीलच रहिवासी असल्याबाबतचा (संबंधित गावातील १५ वर्षे वास्तव्य असल्याबाबतचा) त्यांच्या वास्तव्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला सादर करणे अनिवार्य राहिल.

१४. उमेदवाराने नियुक्तीच्यावेळी लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहिल. तसेच लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करताना दोन पेक्षा अधिक अपत्ये नियुक्तीच्या वेळेस हयात असल्यास अर्ज अपात्र करण्यात येईल. शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, नियुक्तीच्यावेळी किंवा त्यानंतर दोन पेक्षा अधिक अपत्ये हयात असल्यास संबंधित उमेदवार शासकीय नियुक्तीसाठी अपात्र राहिल. (शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.पअक-१००५/प्र.क्र.३६/०५/१६-अ, दिनांक २८.०३.२००५).

१५. महिला उमेदवारांनी त्यांच्या नावात काही बदल असल्यास (लग्नापूर्वीचे नाव, लग्नानंतरचे नाव) त्यासंदर्भात आवश्यक कागदपत्रे, विवाह नोंदणी दाखला कागदपत्रे पडताळणी करून जमा करणे आवश्यक आहे. तसेच एस.एस.सी. अथवा तत्सम प्रमाणपत्रांवरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत. त्यानंतर नाव बदललेले असल्यास अथवा प्रमाणपत्रावरील नावात कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास, त्यासंबंधीच्या बदलासंदर्भातील राजपत्राची प्रत कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करावीत.

Mahabharti.in

१६. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग व इतर मागासवर्ग यासाठी आरक्षण अधिनियम, २००१ (सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.०८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९/०१/२००४ पासून अंमलात आणला आहे व तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२.०२.२०१९ व तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/१६-क, दिनांक २७.०२.२०२४ यांस अनुसरून उपरोक्त शासन निर्णयान्वये आरक्षणासंबंधीच्या तरतुदी लागू होतील.

१७. तसेच वरील अधिनियमानुसार फक्त अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना सोडून उर्वरित मागासवर्गातील सर्व जाती प्रवर्गातील म्हणजे वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इतर मागासवर्ग, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (आ.दु.घ. प्रवर्गातील प्रमाणपत्र) व सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (सा. व शै.मा. प्रवर्गाचे प्रमाणपत्र) उमेदवारांना उन्नत / प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व लागू केले आहे. त्या प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे जाहिरातीस अनुसरून अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व दिनांक १८/११/२०२५ रोजी वैध असलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग या प्रवर्गातील पात्र उमेदवारांनी शासनाने पारीत केलेले व मा. सक्षम अधिकारी यांनी महाराष्ट्र राज्यासाठी लागू असलेले मिळकतीचे प्रमाणपत्र सादर करावे. सदरील प्रमाणपत्र आणि इतर अटी / शर्तींच्या अनुषंगाने पात्रता संबंधित उमेदवारांची ठरविण्यात येईल.

१८. मागास प्रवर्गातील उमेदवारांनी जातीच्या दाखल्याबरोबरच जात पडताळणी समितीने वैध ठरविलेले **जात वैधता प्रमाणपत्र** सादर करणे आवश्यक आहे. सदरील जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२.१२.२०११ नुसार जात वैधता प्रमाणपत्र मिळणेकरीता संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणीबाबत समितीस आवश्यक ते दस्तऐवज सादर केल्याची पोहोच सादर केल्यानंतरच **तात्पुरत्या** स्वरूपाची नियुक्ती देण्यात येईल. **जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे ही सर्वस्वी निवड झालेल्या उमेदवारांची जबाबदारी राहील.**

१९. विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

Mahabharti.in

२०. मागासवर्गीय उमेदवाराची गुणवत्तेवर निवड झाल्यास त्याची निवड ही खुल्या प्रवर्गात झाल्याचे समजण्यात येईल. तथापि सदर उमेदवारांनी देखील मागासवर्गीय उमेदवारांनी सादर करावयाची सर्व कागदपत्रे सादर करणे आवश्यक असेल.

२१. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील उमेदवारांकरीता शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२.०२.२०१९ अन्वये विहित करण्यात आलेले महाराष्ट्र राज्याचे / शासनाचे प्रमाणपत्र, कागदपत्रे पडताळणीच्यावेळी सादर करणे बंधनकारक राहील. (उमेदवारांनी नोंद घ्यावी की, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गाचे केंद्र शासनाचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाही.)

२२. मागासवर्गाच्या आरक्षणासाठी दावा करणाऱ्या सर्व उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी असल्याबाबत नमुद करणे आणि सदरील प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक असेल.

२३. सामाजिक व समांतर आरक्षणा संबंधात विविध न्यायालयांमध्ये दाखल असलेल्या प्रकरणांमध्ये मा. न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पद भरतीची कार्यवाही करण्यात येईल.

२४.वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, माध्यमिक (एस.एस.सी.) परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र ग्राह्य धरणेत येईल. तसेच वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरणेत येईल.

२५.शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक ती माहिती दिलेल्या क्रमाने नमुद करावी. संबंधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजणेत येईल.

२६. गुणांऐवजी श्रेणी पद्धत असल्यास कागदपत्र पडताळणीचे वेळी उमेदवारांनी गुणपत्रकासोबत श्रेणीची (Grade) यादी सादर करावी.

२७.निवड प्रक्रिये दरम्यान गैरवर्तणूक / अनुचित प्रकार / गैरप्रकार करताना दोषी आढळलेल्या उमेदवारांविरूद्ध करण्यात येणारी कार्यवाही- उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चुकीची कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरताना दडवून ठेवू नये. जर उमेदवाराने खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करून सादर केला तर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल व योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**२८.पदांस आवश्यक असलेली अर्हता अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही.**

**१२)उमेदवारांसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याची प्रक्रिया :**

अ) प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे.

आ) अर्ज सादरीकरण.

इ) शुल्क भरणा.

Mahabharti.in

ई) फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे.

अ) **प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे.**

१. https://www.mahaurja.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील वापरकर्त्याने प्रोफाईल निर्मिती करण्याकरीता "सरळसेवा भरती २०२५ / Recruitment २०२५" यावर क्लिक करावे. तद्नंतर पुढे दिलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करावी. संकेतस्थळावर देण्यात आलेल्या https://ibpsreg.ibps.in/medasep25/ या वेबलिंक वरून नवीन खाते (वापरकर्त्याचे नाव Login ID व Password) निर्माण करण्यासाठी, लॉग-इन पृष्ठाद्वारे विचारलेली सर्व माहिती भरून नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी.

२. प्रोफाईलद्वारे माहिती भरताना उमेदवाराने स्वत:चाच वैध ई-मेल आयडी, वैध भ्रमणध्वनी क्रमांक व जन्म दिनांक नोंदविणे आवश्यक आहे.

३. उमेदवाराने आपला वैध ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक आहे. भरती प्रक्रिये दरम्यान पत्रव्यवहार, प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्यामुळे, सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक ऑनलाईन परीक्षेचा अंतिम निकाल लागेपर्यंत वैध असणे आवश्यक आहे. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक चूकीचा / अपूर्ण असल्यास, तसेच भ्रमणध्वनी क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपुर्ण भरतीप्रक्रिये दरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहिल.

४. तसेच, ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) जबाबदार राहणार नाही. उमेदवाराने आपला ई-मेल आयडी व पासवर्ड कोणत्याही परिस्थितीत इतर व्यक्तीसोबत देवाण-घेवाण करू नये. एखाद्या उमेदवाराचा वैध ई-मेल आयडी नसल्यास त्याने अर्ज करण्यापूर्वी स्वत:चा ई-मेल आयडी तयार करणे आवश्यक आहे.

५. वरीलप्रमाणे प्रोफाईलची निर्मिती झाल्यानंतर वापरकर्त्याने स्वत:च्या Login ID व Password द्वारे प्रवेश करून प्रोफाईलमध्ये विचारलेली वैयक्तिक माहिती, संपर्क तपशील, इतर माहिती, शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी संदर्भातील तपशीलाची अचूक नोंद करावी.

आ) **अर्ज सादरीकरण :**

१. अर्ज नोंदणी करण्यासाठी, "नविन नोंदणीसाठी येथे क्लिक करा" (Click here for New Registration) टॅब निवडा आणि नाव, संपर्क तपशील आणि ई-मेल आयडी प्रविष्ट करा. प्रणालीद्वारे तात्पुरता नोंदणी

Mahabharti.in

क्रमांक आणि पासवर्ड तयार केला जाईल आणि वेब स्क्रीनवर प्रदर्शित केला जाईल. उमेदवाराने तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड नोंदवावा. तात्पुरती नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड दर्शविणारा ई-मेल आणि एस.एम.एस. देखील पाठविला जाईल.

२. जर उमेदवार एकाच वेळी अर्ज भरू शकत नसेल, तर तो ‘‘सेव्ह आणि नेक्स्ट’’ (Save & Next) टॅब निवडून आधीच ‘‘एंटर (Enter)’’ केलेला डेटा जतन करू शकतो. ऑनलाईन अर्ज ‘‘सबमिट (Submit)’’ करण्यापूर्वी उमेदवारांना ऑनलाईन अर्जातील तपशीलांची पडताळणी करण्यासाठी ‘‘सेव्ह आणि नेक्स्ट’’ (Save & Next) सुविधेचा वापर करण्याचा सल्ला देण्यात येत आहे आणि आवश्यक असल्यास त्यात बदल करावा. दृष्टिहीन उमेदवारांनी अर्ज काळजीपूर्वक भरावा आणि अंतिम सबमिशन करण्यापूर्वी ते बरोबर असल्याची खात्री करण्यासाठी तपशीलांची पडताळणी करून घ्यावी.

३. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जातील तपशील काळजीपूर्वक भरावा आणि त्याची पडताळणी करावी, कारण ‘‘पूर्ण नोंदणी’’ (Complete Registration Button) बटणावर क्लिक केल्यानंतर कोणताही बदल शक्य होणार नाही / करणे शक्य होणार नाही. कागदपत्रे / प्रमाणपत्रे पडताळणीच्या वेळी चूकीची माहिती भरल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल.

४. उमेदवाराचे नाव किंवा त्याचे / तिचे वडील / पती इ. चे नाव अर्जामध्ये बरोबर लिहिलेले असावे, जसे ते प्रमाणपत्र / गुणपत्रिका / ओळख पुराव्यामध्ये दिसते. कोणताही बदल / तफावत आढळल्यास उमेदवारी अपात्र ठरू शकते.

५. ‘‘तुमचे तपशिल सत्यापित करा’’ (Validate your details) आणि ‘‘जतन करा आणि पुढील’(Save & Next) बटणावर क्लिक करून तुमचा अर्ज जतन करा.

६. फोटो आणि स्वाक्षरी स्कॅनिंग आणि अपलोड करण्याच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये दिलेल्या वैशिष्ट्यांनुसार उमेदवाराने फोटो आणि स्वाक्षरी अपलोड करण्याची कार्यवाही करावी.

७. नोंदणीपूर्वी संपुर्ण अर्जाचे पूर्वावलोकन आणि पडताळणी करण्यासाठी ‘‘पूर्वावलोकन’’ (Preview) टॅबवर क्लिक करा.

८. आवश्यक असल्यास तपशिल सुधारावा आणि छायाचित्र, स्वाक्षरी आणि इतर तपशिल बरोबर असल्याची पडताळणी आणि खात्री केल्यानंतरच नोंदणी पुर्ण वर क्लिक करा. (Complete Registration)

९. ‘‘पेमेंट’’ (Payment) टॅबवर क्लिक करा आणि पेमेंटसाठी पुढे जावे व ‘‘सबमिट’’ (Submit) बटणावर क्लिक करावे.

Mahabharti.in

इ) **शुल्क भरणा :**

१. खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी रू. १०००/-

२. मागासवर्गीय / आ.दु.घ./ अनाथ / दिव्यांग रू.९००/-

३. माजी सैनिक / दिव्यांग माजी सैनिकांना परीक्षा शुल्क आकारले जाणार नाही.

४. उपरोक्त परीक्षा शुल्का व्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

५. परीक्षा शुल्क ना-परतावा (Non Refundable) आहे.

६. उमेदवारांस प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीमधील एका पेक्षा अधिक पदाकरीता अर्ज करावयाचे असल्यास अशा प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करून त्यासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक राहिल.

७. परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी न झाल्यास पुन्हा शुल्क भरण्याची कार्यवाही प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने विहित दिनांक / विहित वेळेपूर्वीच करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास यासंदर्भातील तक्रारींची दखल घेतली जाणार नाही. विहित मुदतीत परीक्षा शुल्काचा भरणा करू न शकणाऱ्या उमेदवारांचा संबंधित भरतीप्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही.

८. परीक्षा शुल्क डेबिट कार्ड (Rupay / Visa / Master Card / Maestro), क्रेडिट कार्ड, इंटरनेट बँकिंग, IMPS, कॅश कार्ड / मोबाईल वॉलेट वापरून पेमेंट केले जाऊ शकते.

९. व्यवहार यशस्वीरीत्या पुर्ण झाल्यावर, एक ई-पावती तयार होईल.

१०. **ई-पावती तयार न होणे अयशस्वी फी प्रदान दर्शविते.**

११. उमेदवारांनी ई-पावती आणि फी तपशिल असलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रिंटआऊट घेणे आवश्यक आहे.

१२. कृपया लक्षात घ्या की, उमेदवारांनी परीक्षा शुल्क दिलेल्या पेमेंट गेटवेद्वारे ऑनलाईन पद्धतीने अदा करावे.

ई) **छायाचित्र व स्वाक्षरी :**

१. ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी उमेदवाराने खाली दिलेल्या वैशिष्ट्यांनुसार फोटो, स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

२. तुमचा फोटो, स्वाक्षरी अपलोड केल्याशिवाय तुमचा ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत होणार नाही.

Mahabharti.in

३. ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराला छायाचित्र, स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी स्वतंत्र लिंक प्रदान केल्या जातील.

४. संबंधित लिंकवर क्लिक करा "छायाचित्र / स्वाक्षरी अपलोड करा" (Upload of Photo / Signature)

५. छायाचित्रातील चेहरा किंवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारला जाऊ शकतो.

६. ऑनलाईन अर्जामध्ये छायाचित्र / स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवारांनी प्रतिमा स्पष्ट आहेत आणि योग्यरित्या अपलोड केलेली आहे हे तपासावे.

७. उमेदवाराने हे सुनिश्चित केले पाहिजे की अपलोड करावयाचे छायाचित्र आवश्यक आकाराचा आहे आणि चेहरा स्पष्टपणे दिसला पाहिजे.


८. स्कॅन करून अपलोड केलेली स्वाक्षरी, प्रवेशपत्र / हजेरीपट व तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल. परीक्षेच्या वेळी, प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीच्या वेळी व अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरताना केलेली स्वाक्षरी व छायाचित्र न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल, अथवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

९. विहित आकार / क्षमतेप्रमाणे काळ्या शाईच्या (बॉल) पेनने स्वच्छ कागदावर स्वाक्षरी करावी. उमेदवाराने स्वत: स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही व्यक्तीने स्वाक्षरी केल्यास ती ग्राह्य धरण्यात येणार नाही.

१०. विहित आकारातील फक्त छायाचित्र व स्वाक्षरी वेगवेगळी स्कॅन करावी. संपुर्ण पृष्ठ अथवा फोटो व स्वाक्षरी एकत्रित स्कॅन करू नये.

११. छायाचित्र अर्जाच्या दिनांकाच्या सहा महिन्याहून आधी काढलेले नसावे आणि ते ऑनलाईन परीक्षेच्या वेळी उमेदवाराच्या रूपाशी जुळणारे असावे, फोटोचा आकार खालीलप्रमाणे असणे गरजेचे आहे.

**छायाचित्र प्रतिमा (रूंदी ३.५ से.मी. X उंची ४.५ से.मी.):**




१. छायाचित्र अलीकडील पासपोर्ट शैलीचे रंगीत चित्र असणे आवश्यक आहे.

२. हलक्या रंगाच्या, शक्यतो पांढऱ्या पार्श्वभूमीच्या विरूद्ध घेतलेले असावे.



Mahabharti.in

३. टोपी आणि गडद चष्मा स्विकारार्य नाहीत.

४. परिमाण २०० X ३०० पिक्सेल (प्राधान्य)

५. फाईलचा आकार २०Kb-५०Kb दरम्यान असावा.

६. स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार ५०Kb पेक्षा जास्त नसावा.

**स्वाक्षरी:**

१. अर्जदाराला काळ्या शाईच्या पेनने पांढऱ्या कागदावर सही करावी लागेल.

- परिमाण १४० X ६० पिक्सेल (प्राधान्य)
- फाईलचा आकार १०Kb-२०Kb दरम्यान असावा. स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार २०Kb पेक्षा जास्त असणार नाही याची खात्री करा.

**२. कागदपत्रे स्कॅन करणे.**

- स्कॅनर रिझोल्यूशन किमान २०० Dpi वर सेट करा.
- रंग True Colour सेट करा.

**टिप : ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर उमेदवारांनी त्यांच्या प्रणालीद्वारे तयार केलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रिंटआऊट घ्यावी.**

**१२) सर्वसाधारण सूचना :**

१. उमेदवारांनी महाऊर्जाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेली सविस्तर जाहिरात वाचून त्याप्रमाणे विहित मुदतीत ऑनलाईन (Online) पद्धतीनेच https://www.mahaurja.maharashtra.gov.in संकेतस्थळावर देण्यात आलेल्या https://ibpsreg.ibps.in/medasep२५/ या वेबलिंक वरून आपले अर्ज सादर करावेत, तद्नंतर सदर संकेतस्थळावरील अर्ज करण्याची लिंक बंद होईल. ऑनलाईन पद्धतीने भरलेल्याअर्जाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारे सादर केलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून सदर संकेतस्थळावर भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरतीप्रक्रिये संबंधित आवश्यक ती अद्ययावत माहिती प्राप्त करून घेण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

२. उपरोक्त नमुद केलेल्या पदांच्या भरतीकरीता महाराष्ट्रातील निश्चित केलेल्या केंद्रावर ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेण्यात येतील. ऑनलाईन परीक्षेची तारीख महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) संस्थेच्या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येईल.

३. ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक

Mahabharti.in

| अ. क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन पद्धतीने अर्ज नोंदणी सुरू होण्याचा दिनांक | २९/१०/२०२५ |
| २. | ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | १८/११/२०२५ वेळ २३:५९ वा. पर्यंत |
| ३. | ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्क भरणेची अंतिम मुदत | १८/११/२०२५ |
| ४. | परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | **परीक्षेच्या आधी ७ दिवस** |

४. नोंदणी व अर्ज भरण्याची प्रक्रिया उमेदवाराने स्वत: काळजीपुर्वक करणे आवश्यक आहे.

५. अर्ज मराठी व इंग्रजीमध्ये उपलब्ध करून देण्यात आला असला, तरी संगणक प्रक्रियेकरीता अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. संक्षिप्तपणे (Abbreviations) वा अद्याक्षरे (Initials) न देता संपुर्ण नाव व संपुर्ण पत्ता नमुद करावा. नावाच्या / पत्त्याच्या दोन भागांमध्ये एका स्पेसने जागा सोडावी.

६. पत्रव्यवहारासाठी स्वत:चा पत्ता इंग्रजीमध्ये लिहावा. व्यावसायिक मार्गदर्शन केंद्र, स्वयं अध्ययन मार्गदर्शन केंद्र / वर्ग अथवा तत्सम स्वरूपाच्या कोणत्याही मार्गदर्शक केंद्राचा / संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देवू नये.

७. अर्जामध्ये केलेला दावा व कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर केलेल्या सारांशपत्रातील अथवा सादर केलेल्या कागदपत्रांतील दावा यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती अनधिकृत समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करू न शकल्यास / न मिळाल्यास उमेदवाराची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

८. संबंधित पदाच्या / परीक्षेच्या जाहिरात / अधिसूचनेमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करूनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता आजमावली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पूर्ण होईल.

९. उमेदवाराने अर्जात स्वत:चे नाव, सामाजिक प्रवर्ग, समांतर आरक्षण, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करू इच्छित आहे तो प्रवर्ग, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. सदरची माहिती चुकल्यास त्यास महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) जबाबदार राहणार नाही.

१०. उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेशपत्रावर / उपस्थिती पत्रावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी. तसेच उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र वरील प्रमाणे सर्व ठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी.

११. अर्ज सादर केलेल्या उमेदवारांस प्राथमिक छाननीच्या आधारे परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येईल. त्यामुळे उमेदवार परीक्षा उत्तीर्ण झाला तरी आवश्यक ती शैक्षणिक व इतर अर्हता असल्याशिवाय व

Mahabharti.in

आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारांस निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज करावा.

१२. भरती प्रक्रियेच्या संदर्भातील सर्व माहिती व त्याअनुषंगाने होणाऱ्या बदलाबाबतची सर्व माहिती केवळ https://www.mahaurja.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल, याव्यतिरिक्त कोणत्याही माध्यमाद्वारे भरती प्रक्रियेची माहिती उपलब्ध होणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१३. विहित दिनांकानंतर व विहित वेळेनंतर आलेला कोणताही अर्ज संगणकीय प्रणालीमध्ये स्विकृत केला जाणार नाही.

१४. वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्ग / नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, दिव्यांग, महिला, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन कर्मचारी, खेळाडू, अनुभव, पात्रता इत्यादी संदर्भात न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे / निर्विवादप्रमाणे माहिती भरणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे माहिती भरली नसल्यास, संबंधित अर्जाचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्ज सादर केल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

१५. अर्जात हेतूपुरस्पर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, परीक्षा कक्षातील गैरवर्तन, परीक्षेचे वेळी नक्कल (copy) करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे अथवा परीक्षा कक्षाचे बाहेर अथवा परीक्षेनंतरही गैरप्रकार करणाऱ्या उमेदवारांना गुण कमी करणे, विशिष्ट किंवा सर्व परीक्षांना वा निवडींना अपात्र ठरविणे, इत्यादी यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलित कायदा व नियमांचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करणेचे अधिकार मा. महासंचालक, महाऊर्जा पुणे यांना राहतील. तसेच विहित केलेल्या अर्हतेच्या अटी पुर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल. तसेच निवड झाल्यानंतर देखील सेवा समाप्तीस पात्र ठरेल.

१६. वरील कार्यपद्धती ही अर्ज करण्याची योग्य पद्धत आहे, याशिवाय दुसऱ्या इतर कोणत्याही पद्धतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविण्यात येतील.

१७. ज्या उमेदवारांनी यापुर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे, सेवा योजन कार्यालय, समाजकल्याण, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयात नावे नोंदविली असली तरी अशा उमेदवारांना विहित मुदतीत स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे व परीक्षा

Mahabharti.in

शुल्क भरणे आवश्यक राहिल (माजी सैनिकांना परीक्षा शुल्क भरणे आवश्यक नाही) तसेच प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन, खेळाडू अशा इच्छुक व पात्र उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्यांना याबाबत या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

१८. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१०/०४/१२, दिनांक ०३.०७.२००४ नुसार रोजंदारी, कार्यव्यापी, करार पद्धतीवर, मानधन, इत्यादी स्वरूपात केवळ पुर्णवेळ काम केले असल्यासच, असा कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरण्यात येईल. मात्र मासिक, नियतकालिक, अंशकालीक, विद्यावेतन, अभ्यागत, अंशदानात्मक, विनावेतन तत्वावर केलेला अंशकालीन सेवाचा कालावधीत तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरता येणार नाही.

१९. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी २०११/प्र.क्र. १०६४/२०११/१६-ब, दिनांक १२.१२.२०११ नुसार मागासवर्गीय उमेदवारांना जात प्रमाणपत्र तसेच नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (लागू असल्यास) कागदपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहिल. शासन निर्णय दिनांक १२.१२.२०११ अन्वये गुणवत्ता यादीत निवड झालेल्या उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे व नसल्यास ०६ महिन्यांचे आत, जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल व याची सर्व जबाबदारी अर्जदाराची असेल. विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधित उमेदवारांना सेवेतून कमी करण्यात येईल.

२०. अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणाऱ्या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशींकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गातील पद आरक्षित / उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

२१. ऑनलाईन परीक्षा ही उमेदवारांच्या कोणत्याही कागदपत्रांची पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे यापरीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पुर्ण छाननी नंतर उमेदवाराची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षण निहाय अंतिम निवड केली जाईल. अर्जातील दाव्यानुसार मुळ कागदपत्रे संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांकडून

Mahabharti.in

पडताळणी / तपासणीच्या आधारे (आवश्यकतेनुसार) पात्र ठरलेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात येईल. तसेच, उमेदवारांनी प्रमाणपत्र मिळण्याकरीता सादर केलेल्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाही. मूळ प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. जात वैधता प्रमाणपत्र वगळून इतर सर्व आवश्यक ती प्रमाणपत्रे ही ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत किंवा त्यापुर्वीच प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे.

२२. शासकीय / निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या संबंधित नियुक्ती प्राधिकरणाच्या परवानगीने भरावयाचा आहे. अशी परवानगी प्राप्त केल्याची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे.

२३. ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे पात्रता परीक्षेस बसण्याचा / कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण करीत नसल्याचे आढळल्यास किंवा खोटी माहिती पुरविल्यास अथवा एखाद्या अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्षरीत्या दबाव आणला अथवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

२४.जाहितराती मधील काही मुद्दे शासन निर्णयाच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतिम राहिल. जाहिरातीतील तांत्रिक / टंकलिखित चुकांचा फायदा उमेदवारांना घेता येणार नाही.

२५. पदभरती पुर्ण होईपर्यंत वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णय / शासन शुद्धीपत्रक / शासन अधिसूचना यानुसार सदर पदभरती नियम / निकषामध्ये बदल होऊ शकतो.

२६. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके, आदेश इत्यादी तसेच महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) सेवाविनियम आणि मा. महासंचालक, महाऊर्जा यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, परिपत्रके इत्यादी बंधनकारक असतील.

२७. अर्ज भरताना एखादा तांत्रिक मुद्दा उपस्थित झाल्यास किंवा तशी परिस्थिती उद्भवल्यास उमेदवारांनी इन्स्टीट्युट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शनच्या https://cgrs.ibps.in/ या helpdesk link वर अथवा १८००२२२३६ व १८००१०३४५६६ या हेल्पलाईनवर क्रमांकावर संपर्क साधावा.

२८. परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी न झाल्यास पुन्हा शुल्क भरण्याची कार्यवाही प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने विहित दिनांक / विहित वेळेपुर्वीच करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास यासंदर्भातील तक्रारींची दखल घेतली जाणार नाही. विहित मुदतीत परीक्षा शुल्काचा भरणा करू न शकलेल्या उमेदवारांचा संबंधित भरतीप्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही.

Mahabharti.in

२९. महाऊर्जा कार्यालयाकडून कळविलेनुसार कागदपत्रे पडताळणी वेळेस शैक्षणिक अर्हता, अनुभव, जात प्रमाणपत्र, वयाबाबतचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र, इ. बाबतची सर्व मुळ कागदपत्रे व त्याच्या प्रत्येकी दोन स्वाक्षांकीत प्रतीसह उमेदवाराने उपस्थित राहणे आवश्यक आहे. कागदपत्रे तपासणीचे वेळी उमेदवार शैक्षणिक व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळुन आल्यास किंवा तपासणीकरीता अपुर्ण कागदपत्रे सादर केल्यास त्यास निवडीसाठी अपात्र करण्यात येईल व त्याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी अर्जासोबत जोडलेली ओळखीचा पुरावा व स्वत:चे आधार कार्ड व त्याची स्वसाक्षांकित (Self Attested) छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

३०. सदर भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर पुर्णत: वा अंशत: रद्द करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार महाऊर्जा राखुन ठेवत आहे.

३१. **दिव्यांग व्यक्तींसाठी मार्गदर्शक सूचना :**

१. दृष्टिहीन व ज्यांच्या लेखन गतीवर कायमस्वरूपी प्रतिकूल परिणाम झालेला आहे असे उमेदवार ऑनलाईन परीक्षे दरम्यान खालील मुद्दा क्र.२८.१० आणि मुद्दा क्र. २८.११ मध्ये नमुद मर्यादेच्या अधीन राहून लेखनिकाचा वापर करू शकतात. जेथे लेखनिक वापरला जातो अशा सर्व प्रकरणांसाठी खालील नियम लागू होतील.

२. लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या परिक्षार्थी यांना स्पर्धा परीक्षेस बसताना लेखनाची अडचण तसेच लेखनाची गती कमी असल्यास त्यांनी केलेल्या मागणीनुसार दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम,२०१६ मधील कलम २ (आर) नुसार लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तींच्या वर्गवारीमधील अंधत्व / शारीरिक दिव्यांगत्व (दोन्ही हात बाधित / नसलेली) / मेंदुचा पक्षाघात असलेल्या दिव्यांग परिक्षार्थींना लेखनिक यांची सुविधा वापरू शकतात.

३. उमेदवाराला त्याच्या / तिच्या स्वखर्चाने स्वत:च्या लेखनिकाची व्यवस्था करावी लागेल.

४. लेखनिक यांची शैक्षणिक पात्रता सदर परिक्षेकरीता असलेल्या किमान शैक्षणिक पात्रतेपेक्षा कमी असावी आणि उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा एका टप्प्याने कमी असावी.

५. उमेदवाराने निवडलेला लेखनिक हा त्याच परीक्षेसाठी उमेदवार नसावा. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वरील नियमांचे उल्लंघन आढळून आल्यास, उमेदवार आणि लेखनिक या दोघांची उमेदवारी रद्द केली जाईल. परीक्षेत लेखनिकाच्या सेवा वापरण्यास पात्र व इच्छित उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये

Mahabharti.in

तसे नमुद करणे आवश्यक राहिल. ऑनलाईन अर्जामध्ये तसे नमुद नसल्यास नंतर लेखनिक वापरण्याची केलेली कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

६. लेखनिक म्हणून सेवा देणारी व्यक्ती एकापेक्षा जास्त उमेदवारांना लेखनिक म्हणून सेवा देऊ शकणार नाही. त्याबाबत उमेदवारानेआवश्यक ती काळजी घ्यावी.

७. लेखनिक उपरोल्लिखित सर्व विहित अर्हतेचे निकषांची पुर्तता करीत असल्याचे हमीपत्र व आवश्यक वैद्यकीय प्रमाणपत्र उमेदवाराने परीक्षा सुरू होण्यापुर्वी पर्यवेक्षक / केंद्र प्रमुख यांचेकडे द्यावे लागेल. तद्नंतर जर उमेदवार किंवा लेखनिक विहित अर्हतेच्या निकषांची पुर्तता करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा त्यांनी मुलभूत माहिती दडविली असल्याचे निष्पन्न झाल्यास ऑनलाईन परीक्षेच्या निकालाची पर्वा न करता, अर्जदाराची उमेदवारी रद्द केली जाईल.

८. उमेदवारांना दिलेल्या भरपाईचा वेळ संगणक प्रणालीवर आधारीत असल्याने ज्या उमेदवारांनी अर्ज करताना लेखनिकाची सेवा घेणार असल्याचे नमुद केलेले आहे. अशा नोंदणीकृत उमेदवारांनाच अतिरिक्त वेळ देण्यात येईल. भरपाईच्या वेळेसाठी नोंदणीकृत नसलेल्या अन्य उमेदवारांना ऐनवेळी अशा सवलतींना परवानगी दिली जाणार नाही.

९. परीक्षेदरम्यान कोणत्याही टप्प्यावर लेखनिक स्वतंत्रपणे प्रश्नांची उत्तरे देत असल्याचे आढळल्यास, संबंधित उमेदवाराचे परीक्षा सत्र समाप्त केले जाईल आणि उमेदवाराची उमेदवारी रद्द केली जाईल. परीक्षा संपन्न झाल्यानंतरही जर परीक्षेदरम्यान लेखनिकाच्या सेवांचा स्वतंत्रपणे प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी वापर केल्याचे परीक्षा प्रशासनास आढळून आल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी देखील रद्द केली जाईल.

१०. **अस्थिव्यंग आणि मेंदूचा पक्षाघात असलेल्या उमेदवारांसाठी मार्गदर्शक सूचना :** अस्थिव्यंग आणि मेंदूचा पक्षाघात (किमान ४० % दिव्यांगत्व) असलेल्या उमेदवारांनी आवेदन पत्रामध्ये तसे नमुद केलेले असल्यास त्यांना प्रति तास २० मिनिटे अतिरिक्त वेळ दिला जाईल.

**११. दृष्टिहीन उमेदवारांसाठी मार्गदर्शक सूचना :** दृष्टिहीन ज्यांना (४०% अथवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व आहे) उमेदवार परीक्षेसाठी मॅग्निफाइड फॉन्टची सुविधा उपलब्ध करण्याचा पर्याय घेऊ शकतात. तसेच अशा उमेदवारांना भरपाई म्हणून दर तासासाठी अतिरिक्त २० मिनिटे देण्यात येतील.

१२. सदरची मार्गदर्शक तत्वे केंद्र / महाराष्ट्र शासनाने वेळावेळी जाहीर केलेल्या सूचनांनुसार / निर्णयानुसार असून त्यामध्ये शासनाने बदल केल्यास ते बदल लागू राहतील.

Mahabharti.in

**१३) परीक्षा :**

१. परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे. परीक्षेचे ठिकाण, दिनांक व वेळ ई-मेल किंवा एस.एम.एस. (SMS) द्वारे संबंधित उमेदवारांना कळविण्यात येईल. तसेच महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) च्या संकेतस्थळावर प्रसिद्धीस देऊन माहिती कळविण्यात येईल. त्यामुळे अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळास भेट देणे आवश्यक राहिल.

२. परीक्षेसाठी प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या विचारात घेऊन आवश्यकता असल्यास सदर परीक्षा ही एकापेक्षा अधिक दिवशी व एकापेक्षा अधिक सत्रात घेण्यात येईल. अशा प्रत्येक सत्रातील परीक्षेसाठी विहीत केलेल्या अभ्यासक्रमावर आधारीत वेगवेगळी प्रश्नपत्रिका असेल. संबंधित उमेदवारास त्याचा प्रत्यक्ष परीक्षेचा दिनांक, वेळ व परीक्षा केंद्रांचा तपशील प्रवेशपत्रामध्ये नमुद केले जाईल. परीक्षेचे प्रवेशपत्र हे परीक्षेपुर्वी ७ दिवस आधी https://www.mahaurja.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर देण्यात आलेल्या https://ibpsreg.ibps.in/medasep25/ या वेबलिंक वरून प्राप्त (Download) करून घ्यावे. वरील वेळापत्रकामध्ये काही बदल झाल्यास, सुधारीत वेळापत्रक फक्त https://www.mahaurja.maharashtra.gov.in याच संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल.

३. परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशपत्राची प्रत व ओळखीचा पुरावा (छायाप्रतीसह) सोबत ठेवणे बंधनकारक आहे. त्याशिवाय कोणत्याही उमेदवारांस परीक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही. परीक्षेनंतर प्रस्तुत प्रवेशपत्र स्वत: जवळ जपून ठेवावे व परीक्षा कक्षात प्रवेश पत्र व ओळखीच्या पुराव्याची छायाप्रत जमा करावी.

४. ऑनलाईन परीक्षेनंतर निवडीसाठी पात्र उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीकरीता बोलविण्यात येईल.

५. काही अपरिहार्य कारणास्तव परीक्षेच्या तारखांमध्ये / परीक्षेच्या ठिकाणामध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती https://www.mahaurja.maharashtra.gov.in या महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) च्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरूपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

६. उमेदवारांनी उपलब्ध असलेल्या परीक्षा केंद्रामधून तीन परीक्षा केंद्र निवडावे.

७. सदरची परीक्षा ही "ऑनलाईन" पद्धतीने संगणकावर विविध सत्रात घेणेत येणार असल्याने उमेदवाराने निवडलेले परीक्षा केंद्रच उमेदवाराला मिळेल याची हमी देता येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

८. परीक्षा केंद्र, परीक्षेचे ठिकाण, दिनांक, वेळ व सत्र इत्यादी बाबत बदलाची विनंती मान्य केली जाणार नाही.

Mahabharti.in

९. उमेदवारांनी आपल्या जबाबदारीवर स्वखर्चाने परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावयाचे आहे.

१०. परीक्षेच्या व्यवस्थापनामध्ये काही समस्या येण्याची शक्यता पुर्णपणे नाकारता येत नाही. ज्यामुळे ऑनलाईन चाचणी वितरणावर तसेच निकालावर परिणाम होऊ शकतो. अशावेळी या समस्यांचे निराकरण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.

११. परीक्षेशी संबंधित सर्व बाबींमध्ये महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) चा निर्णय अंतिम असेल आणि तो उमेदवारावर बंधनकारक असेल. या संदर्भात महाऊर्जाकडून कोणताही पत्रव्यवहार किंवा वैयक्तिक चौकशी केली जाणार नाही.

१२. परीक्षेनंतर पात्र उमेदवारांना मिळालेल्या गुणांची यादी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) च्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**१४) ओळख पटवणे :**

१. परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे व उमेदवाराचा अलीकडील फोटो चिकटवलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड (Pan Card) / पारपत्र (Passport) / वाहनचालक परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter ID) / फोटो सहीत आधार कार्ड, बँकेचे फोटोसहीतचे पासबुक, महाविद्यालय / विद्यापीठाचे अलीकडील मॅच ओळखपत्र / कर्मचारी ओळखपत्र / फोटो सहित असणारे बार काउन्सिलचे ओळखपत्र हे समवेक्षक / पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराची ओळख ही उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपत्रक / उपस्थितीपत्रक आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटविणेबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परिक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही.

२. उमेदवाराने मूळ प्रवेशपत्राची छायापत्र व ओळखपत्राची छायापत्र परीक्षा हॉलमध्ये जमा करणे आवश्यक राहिल.

३. रेशनकार्ड, शिकाऊ वाहन परवाना ओळखपत्र म्हणून ग्राह्य धरला जाणार नाही.

४. परीक्षेला उशिरा येण्याबाबत- परीक्षेच्या प्रवेशपत्रात परीक्षेला हजर राहण्यासाठी दिलेल्या वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांना परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. प्रवेशपत्रावरील परीक्षेसाठी उपस्थित राहण्यासाठी वेळ ही प्रत्यक्ष परीक्षा सुरू होण्याच्या आधीची असणार आहे. परीक्षेसाठी विहित वेळ (जसे १२० मिनिटे) देण्यात आलेली असली तरी उमेदवारास ओळख पटवणे, आवश्यक कागदपत्रे जमा करणे, सूचना देणे या सर्व बाबी पुर्ण करण्यासाठी साधारण एक तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे लागेल.

Mahabharti.in

५. उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहताना स्वत:ची ओळख पटविण्यासाठीची आवश्यक ती मूळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील नाव (परीक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार), सोबत सादर करण्यात येणाऱ्या ओळखपत्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. **ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या / मधल्या / शेवटच्या नावात विवाहानंतर फरक पडला असेल त्यांना याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र / विवाह नोंदणी प्रमाणपत्र यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे.** परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.)

६. **परीक्षेच्या वेळेत किंवा एकुण निवड प्रक्रियेदरम्यान जर उमेदवाराने** :अनुचित प्रकार करणे किंवा,तोतयेगिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे किंवा, परीक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणूक करणे किंवा परीक्षेच्या पेपरमधील माहिती किंवा तत्संबंधी काही माहिती कोणत्याही कारणासाठी पुर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी किंवा लेखी किंवा इलेक्ट्रॉनिकली किंवा मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित करणे, पाठवणे, साठवणे किंवा, स्वत:च्या उमेदवारीबद्दल अनियमित किंवा, भ्रमणध्वनी किंवा, स्वत:च्या उमेदवारीबद्दल गैरमार्गाने पाठिंबा मिळविणे किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर परीक्षेच्या ठिकाणी करणे. परीक्षा कक्षातील परीक्षा नियंत्रण अधिकारी याच्याशी अरेरावी करणे, उद्धटपणे वागणे, त्यांना लाच देऊ पाहणे अशा कृत्यांमध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारास फौजदारी कारवाईस सामोरे जावे लागेल तसेच सदर उमेदवारास परीक्षेसाठी अपात्र ठरविले जाईल.

**१५) परीक्षेचे स्वरूप व दर्जा :**

१. सर्व पदांसाठी ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेचे स्वरूप व दर्जा परिशिष्ट ‘अ’ मध्ये दर्शविण्यात आलेला आहे.

२. सर्व पदांसाठी संगणक प्रणालीद्वारे ‘‘ऑनलाईन परीक्षा’’ वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपात परिशिष्ट ‘अ’ नुसार घेण्यात येईल. परीक्षा राज्यातील निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रांवर घेण्यात येईल.

३. उमेदवार विशिष्ट पदावर नेमणूक होण्यास कितपत योग्य आहे आणि त्याची मानसिक क्षमता किती आहे, ते आजमावणेकरीता परीक्षेच्या वेळी विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांमध्ये इतर प्रश्नांबरोबरच अंकगणित, बौध्दिक चाचणी आणि अपारंपारिक ऊर्जा या संबंधीचे प्रश्न यांचाही समावेश असेल. महाऊर्जा संकेतस्थळावरील भरती / Recruitment या टॅब अंतर्गत अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

Mahabharti.in

४. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) ही संस्था नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय (एमएनआरई) अंतर्गत महाराष्ट्र राज्यात अक्षय ऊर्जेचा विकास करणे आणि ऊर्जा संवर्धन सुलभ करणेकरीता राज्य नोडल एजन्सी म्हणून काम करते. त्यामुळे प्रकल्प कार्यकारी अधिकारी व प्रकल्प अधिकारी या पदाकरीता इतर अभियांत्रिकी उमेदवारांनी अर्ज केले असले तरी, सदर क्षेत्रातील विषय ज्ञानावरच परीक्षा घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

५. परिशिष्ठ ‘अ’ मधील सर्व पदांसाठी संगणक आधारीत परीक्षेद्वारे (Computer Based Online Examination) घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन परीक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार केली जाईल. गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवाराने किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहिल. गुणवत्ता यादीतील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांची निवडसूची (निवड यादी व प्रतिक्षा यादी) तयार करण्यात येईल.

६. ऑनलाईन परीक्षेतील प्रश्नांचा स्तर हा त्या त्या पदांच्या सेवा प्रवेश नियमांमध्ये विहित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेच्या दर्जापेक्षा निम्न असणार नाही.

७. ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेण्यात येणार असल्यामुळे परीक्षेची प्रश्नपत्रिका किंवा उत्तरपत्रिका याची प्रत उमेदवारांना मिळणार नाही.

८. ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आलेल्या परीक्षेची उत्तरपत्रिका फेर तपासणी करण्यात येणार नाही, याबाबत उमेदवारांनी कोणत्याही प्रकारे महाऊर्जाशी अथवा कंपनीशी (IBPS) संपर्क साधू नये.

**परिशिष्ठ -अ**

| **अ.क्र.** | **पदाचे नाव** | **भाग-१**<br>**बौध्दिक चाचणी** | **भाग-२**<br>**तांत्रिक**<br>(ऊर्जा / लेखा क्षेत्राशी संबंधित विषय ज्ञानावर आधारित) | **एकुण प्रश्न** | **एकुण गुण** | **परीक्षेचा कालावधी (मिनिटे)** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **एकुण प्रश्न** | **एकुण प्रश्न** | | | |
| १. | **प्रकल्प कार्यकारी अधिकारी** | ८०<br>(४० गुण) | ८०<br>(१६० गुण) | १६० | २०० | १२० मिनिटे |
| | काठिण्य पातळी | पदवी | विद्युत अभियांत्रिकी पदवी दर्जाचे प्रश्न | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी / इंग्रजी | मराठी / इंग्रजी | | | |

Mahabharti.in

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २. | **प्रकल्प अधिकारी** | ८० (४० गुण) | ८० (१६० गुण) | १६० | २०० | १२० मिनिटे |
| | काठिण्य पातळी | पदवी | विद्युत अभियांत्रिकी पदवी दर्जाचे प्रश्न | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी / इंग्रजी | मराठी / इंग्रजी | | | |
| ३. | **लेखापाल** | ८० (४० गुण) | ८० (१६० गुण) | १६० | २०० | १२० मिनिटे |
| | काठिण्य पातळी | पदवी | पदवी | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी / इंग्रजी | मराठी / इंग्रजी | | | |

टिप : परीक्षा ही Computer Based Test पद्धतीने घेण्यात येणार आहे. एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये परीक्षा घ्यावी लागल्यास (In case the examination is held in more than one session) प्रत्येक सत्राच्या प्रश्नपत्रिका स्वतंत्रपणे उलब्ध करून देण्यात येतील. सत्र १ ते अंतिम सत्र यामधील प्रश्नपत्रिकेचे स्वरूप व त्याची काठिण्यता तपासण्यात येऊन त्याचे समानीकरण करणेचे (Normalization) पद्धतीने गुणांक निश्चित करून निकाल जाहीर करणेत येईल. सदर Normalization सर्व उमेदवारांना बंधनकारक राहिल, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**१६) निवडप्रक्रिया / निवड कार्यपद्धती :**

१. पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची संख्या विचारात घेऊन संभाव्य निवड क्षेत्रामध्ये येणाऱ्या उमेदवारांना कागदपत्रे तपासणीकरीता पाचारण करण्यात येईल. त्याबाबतची यादी व वेळापत्रक महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) च्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच ई-मेल अथवा मोबाईलवर मेसेजद्वारे सूचना देण्यात येतील.

२. **उमेदवारांना समान गुण मिळाल्यास :** उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेमध्ये समान गुण मिळाल्यास परीक्षेचा निकाल तयार करताना गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे राहिल.

अ) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहिल.

आ) समान गुणप्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य नसेल अथवा वरील अ.क्र. (१) नुसार एकापेक्षा अधिक उमेदवार समान गुणप्राप्त असतील तर त्यापैकी वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

Mahabharti.in

इ) वरील अ.क्र. (अ) व (आ) या दोन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकास उच्चतर शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

ई) वरील अ.क्र. (अ), (आ) व (इ) या तिन्ही अटींमध्ये समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्रथम प्राधान्यक्रम देण्यात येईल.

उ) टिप- आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य म्हणजे महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दि. २३ जानेवारी, २००६ अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटूंबास शेतकऱ्याच्या आत्महत्याप्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटूंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य (पत्नी / मुलगा / मुलगी) होय.

ऊ) अर्हता / पात्रता गणण्याचा दिनांक — प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकास संबंधित शैक्षणिक अर्हता / पात्रता धारण करणे आवश्यक आहे.

**१७) निवडसुचीची कालमर्यादा :**

१. निवड समितीने तयार केलेली निवडसुची १ वर्षासाठी विधीग्राह्य राहिल. तद्नंतर हि निवडसुची व्यपगत होईल. भरती प्रक्रियेदरम्यान शासनाने भरतीप्रक्रिया, निवडसुची, प्रतिक्षासुची इत्यादीचे अनुषंगाने दिलेले निर्देश तथा सुचना किंवा सुधारणा यथास्थितीत लागू राहतील.

२. गुणवत्तायादीतील ज्येष्ठतेनुसार उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस केल्यानंतर कागदपत्रांची पडताळणी पुर्ण झाल्यानंतर नियुक्त केलेला उमेदवार सदर पदावर विहित मुदतीत रूजू न झाल्यास किंवा संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार किंवा जात प्रमाणपत्र / अन्य आवश्यक प्रमाणपत्रांची अनुपलब्धता / अवैधता किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास अथवा शिफारस केलेला उमेदवार रूजू झाल्यानंतर नजिकच्या कालावधीत त्याने राजीनामा दिल्यामुळे किंवा त्याचा मृत्यू झाल्याने पद रिक्त झाल्यास, अशी पदे त्या-त्या प्रवर्गाच्या निवडसुचीतील प्रतिक्षा यादीतील उमेदवारांमधून निवडसुचीच्या कालमर्यादेत वरिष्ठतेनुसार उतरत्या क्रमाने भरण्यात येतील. तथापि, भरती प्रक्रियेदरम्यान शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने भरती प्रक्रिया, निवडसुची, प्रतिक्षासुची इत्यादीचे अनुषंगाने दिलेले निर्देश तथा सुचना किंवा सुधारणा यथास्थितीत लागू राहतील.

३. गुणवत्ता यादी व निवडसूची ही प्रवर्ग निहाय तयार करण्यात येईल.

Mahabharti.in

**१८)सेवाप्रवेशोत्तर शर्ती :**

१. हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यातून सुट मिळाली नसेल तर भाषा संचालनालयाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल.

२. शासन नियमानुसार नियुक्तीसाठी पात्र असणाऱ्या उमेदवारांना जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडून वैद्यकिय तपासणी करून घ्यावी लागेल. वैद्यकिय तपासणी करीता येणाऱ्या खर्चाची जबाबदारी उमेदवाराची राहिल.

३. चारित्र्य पुर्व पडताळणी अंती आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी / सेवेसाठी पात्र राहणार नाही. तसेच कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील.

४. संगणकाच्या ज्ञानासंदर्भात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९,दिनांक १९.०३.२००३ तसेच शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान विभाग (सा.प्र.वि.) विभाग क्रमांक मातंस-२०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४.०२.२०१३ तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार / शुद्धीपत्रक / शासन निर्णयानुसार संगणक अर्हता प्राप्त करणे आवश्यक राहिल.

५. निवड झालेल्या उमेदवारास प्रथम एक वर्ष परिविक्षाधीन कालावधी करीता नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती झाल्यावर उमेदवारास महाऊर्जाच्या सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास, त्याने तीन महिन्यांची पुर्व सूचना देणे व व्यवस्थापनाची पुर्व मंजुरी घेणे त्यांच्यावर बंधनकारक राहिल.

६. निवड झालेल्या उमेदवारास, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) मुख्यालय, पुणे कार्यालयाच्या अधिनस्त, राज्यातील इतर महाऊर्जा विभागीय व जिल्हा कार्यालयांतील रिक्त पदांवर नियुक्ती करण्यात येईल. तसेच नियुक्त झालेले उमेदवार शासन नियमांनुसार व महाऊर्जा सेवा प्रवेश नियमानुसार बदलीस पात्र असतील.

सदर जाहिरात महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) संस्थेच्या https://www.mahaurja.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळ प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

**स्वाक्षरीत/-**
(ओम प्रकाश बकोरिया)
महासंचालक, महाऊर्जा-पुणे
महाराष्ट्र राज्य

स्थळ: पुणे
दिनांक : २९/१०/२०२५

Mahabharti.in